नि.फौ.ख.क्र. १८६४/२००८
सरकार/ बळीराम
नि.क्र.४६

<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१ यांची जबानी फौजदारी प्रक्रीया संहिता चे कलम २९९ अन्वये सुरु</u>

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | **:** | **विजय गणपतराव मुन,** |
| **वय** | **:** | **६७ वर्षे, व्यवसाय : सेवानिृत्त,** |
| **राहणार** | **:** | **सुरजनगर, रायपुर, हिंगणा, तह–हिंगणा, जिल्हा–नागपूर** |

**सरतपासणी–सहा.सरकारी अभियोक्ता श्री एस.पी. देशमुख यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–**

मी आरोपीला ओळखत नाही. मी सन–१९९९ मध्ये मी महाराष्ट राज्य विद्यूत महामंडळमध्ये लाईनमन म्हणुन कार्यरत होतो. त्यावेळेस माझे कार्यक्षेत्र हिंगणा होते. त्यावेळेस डिसेंबर–१९९९ मध्ये इंदूबाई पेशने यांनी तक्रार दिली होती की, त्यांच्या हिंगणा शिवारातील क्षेत्रामध्ये लाईन नाही. तेव्हा मी व माझे सहकारी तेथे पाहण्यास गेलो असता, तेथे दिसुन आले की, पाच स्पॅम/तारांची अंदाजे लांबी एकुण एक किलोमिटर व वजन १७५ किलो व त्याची किंमत अंदाजे १८,०००/– असे कोणीतरी चोरुन नेलेले दिसले. त्यानंतर मी आमच्या कार्यालयात जावुन कनिष्ठ अभियंता श्री दिगांबर भोपळे यांना सदर घटनेची माहिती दिली. त्यानंतर कनिष्ठ अभियंता श्री दिंगांबर भोपळे यांनी मला तक्रार लिहुन दिली व सदर तक्रार पोलीस स्टेशनमध्ये नेवुन देण्यास सांगीतली. त्यानंतर मी सदर तक्रार हिंगणा पोलीस स्टेशनला नेली. सदर तक्रार मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला एक तक्रार दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी व कनिष्ठ अभियंता दिगांबर भोपळे यांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर तक्रारला <u>**नि.क्र.४७**</u> देण्यात आले. त्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला. सदर प्रथम खबर अहवाल मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला एक प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास <u>**नि.क्र.४८**</u> देण्यात आले. त्यानंतर पोलीसांनी माझा जवाब नोंदविला. त्यानंतर पुढे काय झाले मला माहिती नाही. मी आरोपीला कधीही पाहिले नाही.

<u>**आरोपी विरुध फौजदारी प्रक्रीया संहिता चे कलम २९९ अन्वये जबाब नोंदविल्यामुळे उलटतपास घेण्यात आलेले नाही.**</u>

वा.दा.ब.अ.क. केले.

माझे समक्ष,

VISHAL HARIBHAU KHEDKAR
Digitally signed by VISHAL HARIBHAU KHEDKAR
Date: 2026.04.23 18:13:26 +0530

हिंगणा.
दि. २३.०४.२०२६.

(व्ही.एच.खेडकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
हिंगणा.